**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ७४८/२०२१**

**अपिलार्थी, श्रीमती. आरती जागेश्वर पुराम,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
देवरी ता. देवरी जिल्हा गोंदिया

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक,**
गोंदिया कॅम्प, देवरी, ता. देवरी जि. गोंदिया.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.०१.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११.०१.२०२१ | १३.०१.२०२१, ०२.०२.२०२१ | ०६.०२.२०२१ | १८.०२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ११.०१.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "पोलीस स्टेशन चिचगड ता. देवरी अर्जदार यांचे तक्रार वरुन हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ अन्वये कलम ४ प्रमाणे ३ आरोपी विरुध्द गुन्हा नोंद दिनांक २१.१२.२०२० रोजी झाला असून या प्रकरणाच्या चौकशी मध्ये सिंदीबीरी येथे अर्जदाराचे घरी पोलीसांनी सर्व प्रथम अर्जदाराची आई नामे १) सौ. विजया पुराम यांचे बयाण नोंद करुन घेतले, २) जागेश्वर पुराम यांचे बयाण नोंद करुन घेतले त्याच प्रमाणे ०६.०१.२०२१ रोजी मा. अपर पोलीस अधिक्षक देवरी यांचे कार्यालयामध्ये तक्रारदाराचे बयाण नामे ३) आरती पुराम बयाण नोंद करुन घेतले ४) रेवनाथ वाडीवा या प्रमाणे दोन बयाण नोंद करण्यात आले. पो.स्टे. चिचगड येथे दिनांक ०९.०१.२०२१ रोजी ५) किशोर कुंभरे यांचा बयाण नोंद करुन घेण्यात आला. ६) बॅंकचे स्टेटमेंट पुरावा सादर करण्यात आला होता. यासर्व प्रती सही शिक्का अस्पष्ट झेरॉक्स प्रत असावी सह माहिती इत्यादी " याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी

आमगाव यांनी दिनांक १३.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीने मागितलेली माहिती सादर करणेविषयी सहायक जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार यांना कळविले. त्यावर सहायक जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार यांनी दिनांक २३.०१.२०२१ रोजी सादर केलेली माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी, देवरी यांनी दिनांक ०२.०२.२०२१ रोजी पोलीस स्टेशन चिचगड येथील अभिलेखावर अप क्र.११७/२०२० कलम ४ हुंडाबंदी अधिनियम १९६१ अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम ८(१) (ज) चे तरतुदीनुसार मुद्दा क्र. २,३,४,५ व ६ माहिती नाकारण्यात येत आहे. तसेच एफ.आय.आर. प्रत पुरविण्यात येत आहे, असे अपीलार्थीस कळविले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०६.०२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " मागितलेली माहिती देण्याचे नाकारल्यामुळे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून आदेशात जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी यांनी घेतलेले निर्णय योग्य असून सदर निर्णयाशी सहमती दर्शवून अपील निकाली काढले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०३.०३.२०२१ रोजी** "सर्व मुद्दयांवर माहिती मिळण्याकरीता" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १७.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संकेत देवळेकर उपस्थीत आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक यांचेतर्फे सहायक पोलीस निरीक्षक श्री. विठ्ठल करंबळकर उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपीलार्थी श्रीमती पुराम यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी दिनांक ०२.०२.२०२१ रोजी अपीलार्थीस विहीत मुदतीत माहितीबाबत कळविले आहे. मात्र अपीलार्थी यांनी माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होवून प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले, त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १८.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी यांनी घेतलेले निर्णय योग्य असून सदर निर्णयाशी सहमती दर्शवून अपील निकाली काढले. दाखल केलेल्या द्वितीय अपील दरम्यान याच गुन्हयासंबंधीत तक्रारीवर मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक ०८.०४.२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशात प्रथम दर्शनी अहवाल रद्द बातल केला आहे. वरील माहिती अपीलार्थीस विहीत वेळेत प्रदान करण्यात आली असली तरी मा. उच्च न्यायालयामध्ये सबळ कारणासह बाजू मांडण्यात आली असून या प्रकरणाची कायदेशीर बाब लक्षात घेता, दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले असल्यामुळे वरील ६ ही मुद्दयांची माहिती संबंधीत कागदपत्रे त्यांना आता प्राप्त झाले आहे. मात्र झालेल्या विलंबामुळे त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीत न्यायालयात दाखल प्रकरणात त्यांना त्यांची बाजू प्रभावीपणे मांडता आलेली नाही. याउलट विदयमान जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या माहिती अधिकाराचे अवलोकन केले असता हुंडाबंदी अधिनियम १९६१ मधील कलम ४ अन्वये गुन्हा नोंद केलेला होता. त्यामुळे



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

तपास सुरु असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ मधील कलम ८(१) (ज) चे तरतुदीनुसार मुद्दा क्र. २,३,४,५ व ६ माहिती नाकारण्यात आली होती. मात्र आता दोषारोप पत्र सादर केले असल्यामुळे माहिती प्रदान करता येईल असे नमुद केले आहे. मात्र मा. उच्च न्यायालयाकडून दोषारोप पत्राची प्रत मिळाली असल्यामुळे वरील माहितीचा आता त्यांना उपयोग नाही.

याप्रकरणाची कायदेशीर बाब लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादात गुन्हयाचा तपास सुरु असल्यामुळे कलम ८(१)(ज) नुसार माहिती नाकारण्यात आली होती. अपीलार्थी यांना त्यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जाचा तपशील पुढील पावले उचलण्यासाठी लवकरात लवकर हवा होता. यासर्व बाबी लक्षात घेता जेव्हा माहिती अर्ज सादर केला होता त्यावेळी अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली नाही. तसेच याबाबतीतील ८(१)(ज) अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांची भुमीका ही माहितीचा अधिकार अधिकार कायद्याशी सुसंगत असल्याचे आढळून येत असल्याने प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
नागपूर

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.०१.२०२३**

जावक क्रमांक 77000 दिनांक 6 DEC 2023